# विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक

(नगरपालिका शाखा) नाशिक विभाग, नाशिक -४२२१०१

ई-मेल : crunsk-divcom@mah.gov.in फोन - (०२५३) - ४६२४०१

क्र.नपप्र/शहर समन्वयक/२०२५ जा.क्र .E-२०८८४२६ दिनांक -०१/०८/२०२५

विभागीय सह-आयुक्त, नगरपरिषद प्रशासन, नाशिक विभाग, नाशिक

## शहर समन्वयक (City Co-ordinator): स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) ) - कंत्राटी तत्वावरील पदांकरिता जाहिरात (२०२५)

राज्य अभियान संचालक, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) यांचे कडील निर्देशानुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंमलबजावणीसाठी नाशिक विभागातील नगरपरिषद व नगरपंचायत साठी प्रत्येकी (१ पद) ११ (अकरा) महिन्यांच्या कालावधीकरिता कंत्राटी तत्वावर नेमणूकीकरिता ऑफलाईन पद्धतीने अर्ज नगरपालिका शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक येथे मागविण्यात येत आहे. परिशिष्ट १ मध्ये प्रस्तुत कंत्राटी तत्वावर निवड प्रक्रियेमधुन भरावयाच्या पदांचा तपशील, मानधन, आवश्यक शैक्षणिक पात्रता तसेच अनुभवाचे निकष इ. बाबी नमूद आहेत.

परिशिष्ट - १

| पदाचे नाव व पदसंख्या | शैक्षणिक पात्रता (किमान) | अनुभव निकष (किमान) | मानधन |
|---|---|---|---|
| नाशिक विभागातील नगरपरिषद व नगरपंचायत साठी प्रत्येकी १ पद | मान्यताप्राप्त विद्यापीठातील खालील पैकी कोणत्याही शाखेची पदवी<br><br>१.बी.ई /बी.टेक (कोणतीही शाखा)<br>२. बी.आर्क.<br>३. बी. प्लॅनिंग<br>४. बी.एस.सी (B.Sc) (कोणतीही शाखा) | स्थानिक स्वराज्य संस्था (नागरी) कार्यालयाशी निगडीत कामाचा किमान ६ महिन्यांचा अनुभव आवश्यक आहे. | दरमहा रुपये ४५,०००/- (रुपये पंचेचाळीस हजार फक्त) |

उपरोक्त परिशिष्ट १ मध्ये विहीत केलेल्या अटी व शर्तीची पूर्तता करणाऱ्या उमेदवारांकडुन केवळ ऑफलाईन पद्धतीने कंत्राटी तत्वावर नेमणूक करणेकामी अर्ज मागविण्यात येत आहे.

अटी व शर्ती

१. कंत्राटी तत्वावरील शहर समन्वयकांची नियुक्ती ११ महिन्यापर्यंत राहील.
२. परिशिष्ट -१ मध्ये नमूद शैक्षणिक अर्हता, अनुभव धारण करणाऱ्या उमेदवारांना प्राधान्य दिले जाईल

३. उमेदवाराचे कमाल वयोमर्यादा ३५ वर्ष (शहर समन्वयक म्हणून अनुभव धारण करणाऱ्या उमेदवारास अनुभवाइतकी वयोमर्यादा शिथिल करता येईल.)

४. आवश्यकते प्रमाणे पदांची संख्या कमी-अधिक व पदस्थापनेच्या ठिकाणात बदल केला जाईल.

५. प्रस्तुत पदाकरिता अर्ज फक्त ऑफलाईन पद्धतीने स्विकारले जातील. त्याशिवाय इतर कोणत्याही रितिने सादर केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

६. पात्र इच्छुक उमेदवार यांचे अर्ज कार्यालयीन वेळेत तसेच सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी देखील, श्री परमेश्वर तावडे, कर व प्रशासकीय अधिकारी, नगरपालिका शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक यांचे कडे स्वीकारले जातील याची नोंद घ्यावी.

७. सदर जाहिरात विभागीय आयुक्त नाशिक यांच्या संकेतस्थळ (website) वरती तसेच कार्यालय येथील सूचना फलकावर देखील पहावयास उपलब्ध राहील.

८. अर्ज करण्याचा कालावधी दिनांक ०२/०८/२०२५ रोजी ते दिनांक ०८/०८/२०२५ रोजी संध्याकाळी ६.०० वाजे पर्यंत राहील.

९. सर्व शहर समन्वयक (City Co-ordinator) पदे ही निव्वळ कंत्राटी स्वरुपाची असून केवळ ११ महिन्यांकरिताच्या कालावधीकरिता राहतील.

१०. सदर कंत्राटी पद्धतीने नियुक्त करण्यात येणाऱ्या शहर समन्वयक (City Co-ordinator कोणतेही शासकीय लाभ प्रत्यक्षपणे अथवा अप्रत्यक्षपणे मिळणार नाहीत तसेच लागू ही नाहीत. त्याचप्रमाणे त्यांना कसल्याही प्रकारचे वेतन भत्ते अदा केले जाणार नाहीत.

११. सदर कंत्राटी पदावरील निवडीमुळे भविष्यात शासकीय सेवेत सामावून घेणेस पात्र असणार नाहीत. अथवा तशा प्रकारचा कोणताही दावा करता येणार नाही. याची जाणीवपूर्वक नोंद घ्यावी.

१२.प्राप्त अर्जाची छाननी करुन छाननीअंती पात्र उमेदवारांना मुलाखतीकरिता त्यांनी आवेदनपत्रात नमूद केलेल्या ई-मेलव्दारे स्वतंत्ररित्या कळविण्यात येईल. तसेच पात्र उमेदवार यांची यादी विभागीय आयुक्त नाशिक यांच्या संकेतस्थळ (website) वरती तसेच कार्यालय येथील सूचना फलकावर देखील पहावयास उपलब्ध राहील.

१३. नियुक्ती बाबतचा अंतिम निर्णय तसेच सदर कंत्राटी पदांची निवडप्रक्रीया कोणत्याही स्तरावर कोणतेही कारण नमूद न करता रद्द करण्याचा अधिकार सह आयुक्त, नगरपरिषद प्रशासन विभाग, विभागीय आयुक्त कार्यालय नाशिक यांनी राखून ठेवलेला आहे.

स्वाक्षरीत /-

सह आयुक्त,नगरपरिषद प्रशासन विभाग,

विभागीय आयुक्त कार्यालय,नाशिक